वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० ६ माहे अक्टोबर सन १८७८ इसवी. | अंक ४०

वऱ्हाडसमाचाराची किंमत

	रुपये
वर्षाचे अगाऊ	५
सालअखेर	७
किरकोळ अंकास	०४
डांकहाशील.	
वर्षाचे अगाऊ	१०८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिसीबद्दल.

मराठी, १० ओळीचे आंत	१
१० ओळीपुढें दर ओळीस	०१०६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०४
,, दुसरे खेपेस	०२

जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

	किंमत.
गजकरणाच्या डब्या	०६
महामारीवरील गोळी	०१
भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स	०६
वैद्यप्रकाश.	२०८
नादारीचे नियम.	०८

सदर्हू किमती रोख व शिवाय डाक हशील पडेल.

पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

वि. वि. मुळाव्याचा कुळकर्णी जयराम तुकाराम हा वाशीमास साक्षीकरितां गेला असतां परत येतांनां वाटेंत उडदीचे घाटावर त्यास उपद्रव होऊन ब्राह्मणगाव एथें तो मरण पावला त्याचा भाऊ दारव्हेह तालुक्यांत रामगावास मास्तर होता तो रजा घेऊन गावीं त्याचे उत्तर कार्यास आला जयराम मजकूर आजारी झाला तेव्हां त्याजवळ ६०।७० रुपयांचा विषय होता तोही कोणी चोरला असें समजतें. काय चमत्कार आहे!

इकडे पाऊस अतिशय पडला. खरीपाचीं पिकें सर्व गेलीं. रबी पेरण्याचे दिवस जवळ आले आहेत. तरी आतां परमेश्वरानें लवकर उघाडी द्यावी.

उमरखेडचे स्पेशल मानिस्त्रेट रा. रा. त्रिंबकराव प्रभाकर हेही वाख्याचे उपद्रवानें मोगलाईत मरण पावले त्यांचे जागेवर अजून कोणी नेमिलें नाहीं. यास मूल बाळ कांहीं नाहीं. यांचें वय सुमार ३० व षांचे होतें. कळावें तारीख २५ सप्टेंबर सन १८७८ इ० मुक्काम मुळावें.

एक कनवाळु.

इलिचपूर शहरवासी जनांचें दुर्दैव.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. शहर मजकूर हे वऱ्हाडप्रांताची प्राचीन राजधानी असून एथें तहशिलदार कचेरी, आनररी माजिस्त्रटाची कचेरी, दवाखाना, म्युनिसिपाल कमिटीचें आफीस, पोष्ट आफिस, इं. म. शाळा, व निवळ मराठी आणि हिंदुस्थानी मिळून पांच आणि पूर्व पश्चिम व टाउन इत्यादि पोलिस स्टेशनें इतकीं सरकारचीं ठिकाणें आहेत. एथें पोष्ट आफिस स्थापन झाल्यास आज सुमारें पांच सहा वर्षे झालीं. तत्पूर्वी परतवाडा एथून शिपायांनीं डिलिव्हरी आणून बटवडा करावा अशी वहिवाट होती परंतु शहर आणि छावणी यांचे दरम्यान ३ मैलां पेक्षां जास्त अंतर असून शिपाई लोकांस दररोज तीन मैल जाणें व येणें पडून शहरांत आल्यावर तीन चार मैल बटवडा करण्यास फिरावें लागत होतें अशा रीतीनें एथील शहरवासी कामगार व व्यापारी लोकांस वक्तशीर व शहरवासी इतर व पुरेवासी सर्व लोकांस दोन दोन दिवसपर्यंत पत्रें मिळत नसल्यानें पोष्ट आफिसाची स्थापना झाली तेव्हांपासून तो हा काल पर्यंत विनबोभाट व उत्तम रीतीनें काम चाललें असून शहर मजकूरचे लोकांच्या कमनशीबामुळें एथें टप्पा येऊन डिलिव्हरी होण्याचेंच मात्र बंद होऊन लेटरप्यून ह्यांनींच दररोज प्रातः काळीं परतवाडा एथें जाऊन डिलिव्हरी घेऊन येऊन एथें बटवडा करावा व सायंकाळीं ४ वाजे तोंपर्यंत जो बटवडा होईल तो पैसा व पत्रें एथील पोष्ट मास्तर याचे स्वाधीन करावीं व त्यांनीं एथून जाणारे टप्पा बरोबर परतवाडा एथें सदरील बटवडा करण्याची शिलक राहिलेलीं पत्रें व पैसा रवाना करावा अशी व्यवस्था झाली आहे असें शिपाई लोकांचे सांगण्यावरून कळलें. सदरील अमलवारी आज तारखेपासून अमलांत आली. मी खुद्द शहरांत रहाणारा असुन आज प्रथम दिवशींच जर पत्र दोन प्रहरीं मिळालें तर याप्रमाणानें आणि वरील अटी प्रमाणें पुऱ्यांतील लोकांस अजमासें दोन दोन दिवस पर्यंत पत्रें मिळणें नाहींत हें उघडच होतें. अशा प्रकारानें लोकांचें फार नुकसान आहे.

आतां अशी व्यवस्था करण्यापासून फायदे पाहूं गेलें असतां कोणत्याही अंशांनीं मिळमात्र देखील नसून उलटें नुकसान मात्र आहे असें माझे मतें वाटतें त्या खात्याचे अधिकाऱ्यांस काय फायदा वाटला असेल तो असो. बरें सदरील व्यवस्था केल्यापासून काम काजास कांहीं सोयकर पडत असेल अशी जर कल्पना करावी तर ज्याप्रमाणें सहा वाजतां परतवाड्याहून डिलिव्हरी मिळणार त्यापूर्वीच एथून मिळून ज्यांची त्यांस वक्तशीर पत्रें मिळत जाऊन बहुतकरून सर्व डिलिव्हरी होत असे. त्याप्रमाणें आतां होण्याचा संभव नाहीं. टप्पा रवाना ज्या वेळीं होत आला त्या वेळींच होऊन डिलिव्हरी खेरीज सर्व अधिकार हेड आफिसाप्रमाणेंच असावा असें वाटतें. दुसरें, पृथक पृथक हिशेब ठेवावा लागतो ह्मणून असा प्रकार केला असावा असें मनांत आणिलें तर परतवाडापोस्टआफिसाचे ताब्यांत शहर मजकूरचे पोस्ट आफिसाखालीं अंजनगाव दर्यापूर आणि रिथपुर असून त्याचा जसा हिशेब ठेवावा लागतो त्यांत एका पोस्टाचा हिशेब ज्यास्त ठेवणें ह्मणजे कठीण आहे अशी कल्पना करवत नाहीं. तिसरें, अशा व्यवस्थेपासून सरकारचें कांहीं सेव्हिंग होतें आहे असेंही दिसून येत नाहीं. ज्या इसमाच्या नेमणुका आहेत त्या तर कायमच आहेत. बरें एका हलकाऱ्यासच टप्पा आणावा लागतो व न्यावा लागतो. ह्मणून त्याची तक्रार असून दुसरा हलकारा ठेवण्यापुरतें उत्पन्न नाहीं ह्मणून अशी व्यवस्था केली कीं काय? अशी शंका घ्यावी तर हलकारा एकवार टप्पा घेऊन येत व जात होता असा जरी प्रकार होता तत्रापि जसे इतर लायनीवरील हलकाऱ्यास सहा मैल चालावें लागतें त्याप्रमाणेंच ह्यासही जातां येतां पडत होतें.

डिलिव्हरी एथील पोष्ट आफिसांतून मिळत नसल्यानें लोकांचे तोटे कसे होतात ते पहा. शिपाई लोकांनीं प्रातःकाळीं पांच वाजतां एथून निघून जाऊन सहा वाजतां परतवाड्याचे आफिसांत हजर व्हावें असें जरी आहे तत्रापि त्यास जाऊन पोचण्यास अजमासें सात तरी वाजतील आणि पोंचून डिलेव्हरी घेण्यास निदान एक तास तरी पाहिजेच व एथें येण्यास एक घंटा सहज पाहिजे अशा मानानें ते दररोज नऊ साडे नऊ वाजतां पोचत जातील. पुढें दोन अडीच तास डिलेव्हरी केली ह्मणजे भोजन वगैरे अटोपण्यास २ कलाक अवश्य पाहिजेत इतकीं कृत्यें होई तोंपर्यंत दोन अडीच सहज वाजणार. पुढें घंटा दीड घंटा डिलेव्हरी झाली न झाली तोंच टप्याचे वेळेस हिशेब देण्या करितां हजर झालें पाहिजे. तेव्हां एकंदरीत वक्तशीर ज्या दिवशींचें त्या दिवशींच डिलेव्हरी केली जाईल अशी कल्पना स्वप्नांही आणायाला नको, दुसरें, आजपर्यंत एथें डिलेव्हरी मिळाल्यापासून लोकांस ज्या दिवशीचें त्या दिवशींच पत्र वगैरे मिळून उपद्रव वगैरे चालू असलेल्या अशा वाईट दिवसांत तेंच दिवशीं उत्तर पाठविण्यास सवड सापडत असे तसें आतां होण्यास बिलकूल मार्ग दिसत नाहीं. तिसरें, एथें सदरीं लिहिलेलीं सरकारचीं ठिकाणें असल्यमुळें व व्यापार परदेशांशीं बराच चालत असल्यानें परदेशस्थ नोकर व व्यापारी लोक पुष्कळ आहेत तेव्हां त्यांचे डोळे आपल्या देशच्या पत्राकडे चातक पक्षाप्रमाणें लागत असतात. साहेब लोकांचा विलायतेचा टप्पा येणें असला ह्मणजे त्यांस दोन दोन दिवस पर्यंत काम न सुचून टप्पा मिळण्याविषयीं ते इतके उत्सुक असतात कीं तें सांगतां पुरवत नाहीं. त्याप्रमाणेंच परदेशस्थ लोकांची स्थिति होत असेल हें उघड आहे. आणि चोहीकडे उपद्रव सुरू असल्यानें तर देशचें कुशल वृत्त समजण्यास विशेष उत्कसुता असते तसेंच व्यापारी लोकांस परदेशाचे भाव वगैरे समजण्यास तारायंत्राचें साधन नसोन टप्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं आणि जर वक्तशीर व लौकर पत्रें मिळत न गेल्यास खेरदी अगर विक्री करण्यास फार अडचण पडून व्यापारी लोकांचें हजारो रुपयांचें नुकसान होण्याचा संभव आहे तेव्हां एकंदरींत हल्लीं झालेली व्यवस्था फारच गैरसोयीची आहे अशी सर्व वाचकांची सदरीं लिहिलेले हकीकतीवरून खात्री होईल व आपणही आपला अभिप्राय याबद्दलचा प्रदर्शित कराल अशी आशा आहे.

सदरील झालेल्या व्यवस्थेपासून होत असलेल्या गैरसोईचे निरसनार्थ शहरवासी बडे कामगार व सभ्य लोक व विशेषेंकरून आमचे जिल्ह्याचे मुख्य अधिकारी दयाळु, व लोकप्रिय व लोककल्याणेच्छु मे. मेकंजी साहेबांस दया येऊन होत असलेल्या गैरसोयीची दाद घेऊन त्याचा परिहार त्यांनीं करावा अशी लोकहितबुद्धीनें माझी विज्ञप्ति आहे. कळावें. लोभ करावा हा विनंति.

इलिचपुर ता. १२ सप्तेंबर १८७८ इ. } एक लोकहितेच्छु.

वऱ्हाडसमाचार

मिति आश्विन शुद्ध ११ शके १८००

दुःख, संकटें, रोग कां प्राप्त होतात?

याविषयींचा विच्यार मोठा गहन आहे व त्यांचें खरें कारण एक ईश्वरास मात्र ठाऊक असावयाचें, बाकी आपण मनुष्यांनीं कल्पनेनें जितकें समजेल तितकें प्रयत्नानें पहायाचें आहे. दुःखसंकटादि कां प्राप्त होतात हा जो प्रश्न आहे त्यावर दुसरा प्रश्न आह्मी असा करितों कीं, तीं कां प्राप्त न व्हावीं? सुख, लाभ, आरोग्य

व सुवत्ता हीं जर मनुष्यास प्राप्त होतात तर त्यांच्यांशी सलग्न असणारीं तद्विपरीत जीं सदरील कार्यें तींही मनुष्यांस मिळालीं पाहिजेत असा ईश्वरी संकेत दिसतो. व कुरकुर न करितां तीं निमूटपणीं ग्रहण करावीं अशी प्रत्येक मनुष्याचे मनाची तयारी झाली पाहिजे असें आह्मास वाटतें. आपलें मन कोंवळें आहे तें फार विचार न करितां सुखाला सोकवतें, लाभाला भुलतें, आरोग्यानें फुगतें व सुवत्तेनें बेगुमान होतें. ह्मणूनच तद्विपरीत कार्यें आपणास फार पिडा देतात. मनुष्याला सर्वकाळ ताब्यावर ठेवण्याकरितां दुःखसंकटादिकांचा जोड ईश्वराकडून या जगांत येत असते सबब कोणी त्यासाठीं विव्हळ होऊं नये व गंभीरपणानें तीं सर्व सोसण्यास मनाची तयारी ठेवावी या सारखी दुसरी उत्तम सोय नाहीं. ईश्वर विश्वकुटुंबी आहे व त्याला साऱ्या राष्ट्रांची आणि सर्व मनुष्यांची व्यवस्था पहावी लागते ह्मणून तो योजनेनें जें जें ज्याला ज्याला देण्यास अवश्य आहे तें तें त्याला त्याला देत असतो असें कल्पून जें आपणास प्राप्त होतें तें सर्व त्याचा प्रसाद ह्मणून शांत मनानें ग्रहण करावें इतकाच जगांतील कर्तव्याचा आपला मुख्य भाग दिसतो. सुख दुःख, लाभ संकट हीं एकच प्रकारचीं नाहींत. महाराला १० उष्ट्या पत्रावळी दिल्यानें मोठें सुख वाटेल पण गावच्या पाटलाला त्याच १०० दिल्या तर त्यापासुन त्यास सुखाचा लेश न होतां उलटें मोठें दुःखें होईल. दारावर येणाऱ्या फकीराला किंवा भणंग भिकाऱ्याला एक पैसा मिळाला तर ते संतुष्ट होऊन दाहा आशीरवाद देतात पण तोच एक पैसा लोडाशी बसणाऱ्या द्विजांनां दिला तर ते संतप्त होऊन त्रास देतात तेव्हां एकाच मोलाच्या वस्तूनें सर्वांस सुख संतोष होईल असें दिसत नाहीं. व प्रत्येकाच्या इच्छेनुरूप तत्प्राप्ति तर केवळ पराधीन आहे, तेव्हां यावरून काय बोध घ्यावयाचा कीं ईश्वरइच्छेनें प्राप्त जें होतें तेंच उत्साहानें ग्रहण करण्याची मनाची तयारी ठेवावी. मन अस्वस्थ राहिलें तर कसल्याही सुखपर्यायानें कोणास बरें वाटणार नाहीं. दुःखांत, संकटांत इतकें अधिक काय आहे कीं जे विवेकी प्राण्याला सोसवणार नाहीं; सवयीनें सर्व गोष्टी सुलभ होतात. तुरुंगाची शिक्षा फार वाईट आहे पण ईश्वरी अवकृपेनें कोणास ती प्राप्त झाली तर तो तेथें मिताहारी राहून व कष्टाचें काम करून पहिल्याहून अधिक चांगला सुधारलेला असा बाहेर येतो असेंही कित्येकांचें पहाण्यांत आलें असेल. सबब एवढ्या तेवढ्या गोष्टीनें फार दुःख, फार दुःख असें मानू नये. तें सोसण्यास व योग्य प्रकारें त्याचा परिहार करण्यास मनुष्यानें सदा सज्ज असावें. मला कधीं कांहीं दुःख होऊनये, मजवर संकट येऊं नये, मला कधीं दुखणें येऊं नये, व माझे देशावर आवर्षण येऊं नये असें सर्वकाळ चिंतण्यास ईश्वराचे घरीं मी सर्वांपेक्षां काय अधिक केलें आहे? वास्तविक पहातां ईश्वरांच्या बहुत आज्ञांचा मी बहुतकाल अवमान करितों, जगांत वागण्याच्या ज्या सुष्ट गोष्टी तद्विपरीत मी बहुत प्रसंगीं वागतों तर मग त्याकरितां माझे मनास अनिष्ट अशा गोष्टी मला प्राप्त झाल्या तर मग मीं कां कुरकुरावें? कुरकुरणें केवळ अयोग्य होय, असा प्रत्येक मनुष्यानें प्रत्येक प्रसंगीं विच्यार करावा हें फार आवश्यक आहे असें आह्मांस वाटतें व तेवढा विच्यार पूर्ण झाला व तो ठसला ह्मणजे त्याच्या दुःख संकटाचा लोपच व्हावयास आंरभ झालों असें समजावें. ह्मणजे नुसत्या एवढ्या मनोवृत्तीच्या तयारीनें दुःखरोगादि संकटें त्यावर येणार नाहींत असे नाहीं, पण त्यांचे प्रहार सोसण्यास त्याचें मन शूर पुरुषाच्या हातांतील ढालेप्रमाणें तयार होईल व त्यास मग त्यापासून कांहीं पीडा होणार नाहीं. दुःखा मागून सुख असते, व संकटाच्या अभावीं लाभ असतो या उत्तम विच्यारानें त्याचें मन मोठ्या आणीबाणीच्याही वेळीं शांत आणि गंभीर राहील. वास्तविक पाहिलें असतां ज्या वस्तूस आपण सुख सुख ह्मणून फार मोलाची मानून फुगाविली आहे तींत वास्तविक सुख कांहींच नाहीं. हावरेपणानें आपण नादीं लागून तत्प्राप्त्यर्थ जितका जितका सोस करू लागतो तितकें तितकें तें आपणास मिळत नाहींसें वाटतें. व एकदा त्याच विषयीं आपण उदास झालों ह्मणजे दुःखेंही सुखाप्रमाणेंच अंगवळणीं पडतें असा याचा विच्यार आहे व तो आमच्या विच्यारी व चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत सहज येईल असें आह्मांस वाटतें.

न्याय खात्याचा रिपोर्ट.

सन १८७७

मे० जुडिशियल कमिशनर साहेबाचा रिपोर्ट अलीशान रेसिडेंट साहेब यांनकडे होऊन तो त्यांच्या अभिप्रायासह छापून प्रसिद्ध झाला आहे त्यांतील माहिती व त्यासंबंधी आमचे विच्यार आज आह्मी आपले वाचकांस कळवितों.

या कामाकरितां वऱ्हाडांत कोर्टें आहेत तीं.

१ जुडिशियल कमिशनर
६ डिपुटी कमिशनर
३ स्माल काज कोर्ट
९ असिस्टंट कमिशनर
८ एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर
२ अल्याची
२२ तहशिलदार
१९ नायब तहशिलदार
८ स्पेशियल माजिस्ट्रेट

७८

यावर्षीं मूळ दिवाणी दावे २१७७५ झाले. तिगस्त सालीं २१३३७ होते.

लोकवस्तीच्या मानानें पाहिलें तर वऱ्हाडांत सरासरी १०३ मनुष्यांत एक फिर्यादी आहे. व जिल्ह्याच्या विभागानें पाहिलें तर अकोला जिल्ह्यांत दर ७४ मनुष्यास १ व उमरावती जिल्ह्यांत दर ७८ मनुष्यांत १ आहे. दुतर्फा दाव्याच्या फैसल्यास-सरासरीनें ३८ दिवस लागले व १ तर्फी दाव्यास २१ दिवस लागले. मागील सालीं दुतर्फांस ६६ व एकतर्फांस १७ दिवस लागले होते.

या वर्षांत फिर्यादी करणारे कुणबी लोकांची संख्या शेकडा १९ व मारवाडी लोकांची ३४ आहे. तसेच फिर्यादीचा जाबदेणारे कुणबी शेकडा ४० व मारवाडी शेकडा ३ आहेत. या सालांतील एकंदर फिर्यादींत १७८९३ फिर्यादी पैशाच्या मागणीच्या आहेत. त्यांत ११३८३ लेखी दस्तैवजावरून व ६५१० बिनदस्तैवजाच्या आहेत. करार तोडल्याबद्दल १२०५, भाड्याबद्दल १७९, जंगम मिळकतीबद्दल ९३७, स्थावराबद्दल ९७३, नुकसानीबद्दल १७८ व लग्नसंबंधाबद्दल ३३ आहेत.

या वर्षीं दावे झाल्याची एकंदर मागणी २१३२७८९ रुपयांची आहे. व दाव्यासंबंधी खर्च २६७५३५ रुपये झाला आहे.

ह्या एदंकर हकीकतीवरून गेल्या वर्षापेक्षां अधिक मुकदमे ह्या वर्षास फैल झाले असे दिसते. व्यापार जसजसा चढत्या कळेस येतो तसतसे कोर्टांत दावे अधिक होतात असा सर्वसाधारण समज आहे, व व्यापाराची वृद्धी होणें हें जर देशाच्या भरभराटीचें चिन्ह आहे तर दिवाणी कोर्टांस अधिक काम येणें हेंही त्यांतलेंच समजण्याचें आहे. अलीशान रेसिडेंट साहेब ह्मणतात कीं व्यापार वाढला ह्मणून दावे वाढले. मुकदमे अधिक झाले ह्मणजे कोर्टांचें काम चांगलें चालतें. सरकारानें ठेविलेले खर्चाची चीज आहे. व सरकारास उत्पन्न आहे. हें सर्व खरें आहे परंतु आह्मास वाटतें कीं हल्लींच्या न्यायाचे कोर्टांतील न्याय फार महाग झाला आहे. वास्तवीक प्रसंग येईल तसा पैसा खर्च करण्याची ज्याला ऐपत आहे त्याचीच सोय आहे; याजकरितां सरकारी न्यायाचे कोर्टांतील काम जितकें कमी होऊन अपसांत वाद मिटविण्याची प्रवृत्ति पडेल तितका देशाचा फायदा आहे असें आमचें मत आहे. आपल्या देशांत पूर्वीं पंचाईत करण्याची चाल होती ती फार सोयीची होती. व हल्लींच्या स्थितीस तिची फार गरज आहे. लोकांनीं तिकडे लक्ष पुरवावें आणि सरकारानें त्यांस प्रांजल मनानें सहाय्य द्यावें अशी आमची इच्छा आहे.

हल्लीचा दिवाणी कायदा कांहीं अंशीं दिवाणी कोर्टांतील काम कमी करण्यास कारण होईल परंतु त्याचीं कारणें निराळीं दिसून येतील तेणेंकरून. आमचा इच्छित हेतु कितपत तडीस जाईल याजविषयीं आह्मांस संशय आहे. नुस्ती दिवाणी कोर्टें लोकांस पारखीं होऊन उपयोग नाहीं. तर लोकांनीं तीं सोडून देऊन आपआपसांत आपले तंटे मिटवण्याचें केलें पाहिजे. तसे होईल तरच लोक विशेष सुखी होतील.

हल्लींच्या व्यवस्थेप्रमाणें तहशिलदार लोकांकडेस कांहीं दिवाणी काम आहे व कांहीं असिस्टंट कमिशनर लोकांकडेस आहे आणि कांहीं ठिकाणीं स्वतंत्र अधिकारी दिवाणिकरींत आहेत ही व्यवस्था आह्मास बरी दिसत नाहीं. दिवाणी काम करणारे अधिकारी सर्वत्र निराळे आहेत तसे वऱ्हाडांतही असावेत व ज्या कामगारास इतर कामाचें मनस्वी ओझें आहे त्यांनां व ज्यांनां न्यायाचे संबंधानें नानाप्रकारचे विषय अवगत पाहिजेत असून त्यांचा त्यांचा गंधही नाहीं अशा कामगारास या कामापासून दूर ठेवावें ह्मणजे लोकांस न्यायाचे कोर्टांत येण्याचा हुरूप राहील, त्यांचा न्यायाचे कोर्टावर विश्वास बसेल आणि प्रजेस न्याय चांगला मिळेल. मागच्या वर्षाचा रिपोर्ट आह्मी वाचला त्या वेळेस आह्मास आशा होती कीं वऱ्हाडांत दिवाणी कोर्टें अधिक होऊन स्वतंत्र अधिकारी लवकरच होतील परंतु तसें झालें नाहीं व हल्लींच्या रिपोर्टावरून तो प्रकार अगदीं कानाबेगळाच सरकारानें टाकल्याचें दिसतें. या रिपोर्टांत नवीन मुनसफ कोर्टें होणार होतीं त्याविषयीं एक शद्बही नाहीं. सरकार तसें करूं इच्छित नाहीं किंवा ते तोट्याचें काम आहे, अथवा त्याची गरज नाहीं, यापैकीं कोणता विच्यार आहे तें कांहींच कळत नाहीं. आमच्या मतें दिवाणी कोर्टें स्वतंत्र असावींत व तसें करण्याची गरज असून तें तोट्याचें काम नाहीं असें हल्लींच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या मानावरून स्पष्ट होतें. वऱ्हाडची प्रजा आपल्या जरूरी सरकारास कशा कळवाव्या हें जाणत नाहीं ह्मणून प्रजेस कांहीं गरज नाहीं अशी सरकार कल्पना करीत असेल पण खरी गोष्ट तशी नाहीं.

वऱ्हाडांत स्मालकाज कोर्टें आहेत त्यांच्या कामाच्या व उत्पन्नांच्या आणि खर्चाच्या प्रमाणावरून हीं सर्व कोर्टें व्यथ आहेत असें आह्मास वाटते. ज्या ठिकाणीं मोठा व्यापार आहे व लक्षावधि रुपयांच्या नित्य घडामोडी आहेत तेथें क्षुल्लक कामाकरितां तोडच्या तोडीं निकाल करणारे कोर्टांची गरज आहे परंतु तो प्रकार वऱ्हाडास लागू नाहीं. इकडे व्यापार मुंबई पुणें वगैरे ठिकाणासारखा मोठा नाहीं या प्रांतांत तंट्यांचें मान पाहिलें असतां ३०० च्या आंतील दावे फार व बहुतेक व्यापार कुणबी लोकांशी यामुळें गहाणावाचून व्यापार बहुधा कमीच तेव्हां अशा ठिकाणीं गहाणाचे संबंधानें बहुतेक दावे इतर कोर्टांत जातातच मग थोड्याशा क्षुल्लक देण्या घेण्याच्या दाव्यासाठीं मोठमोठाले अधिकारी येऊन स्मालकाज कोर्टें चालवणें कांहीं चांगलें नाहीं. त्या पेक्षां मुनसफ कोर्टें करून मुनसफ लोकांसच कांहीं एक मर्यादेच्या तंट्यात स्मालकाज कोर्टयाचे अधिकार दिले असतां कमी खर्चांत काम होणार आहे व अशी व्यवस्था मुंबई इलाक्यांत हल्लीं आहे व तिकडे स्मालकाज कोर्टें फार थोड्या ठिकाणीं आहेत. एका स्मालकाज कोर्टांत जितके दावे निकाल होतात तितकेच किंवा त्याहून अधिक दावे एका ए. अ. क. (मुनसफ) कोर्टांत होतात इतकेच नाहीं तर खामगावच्या स्मालकाज कोर्टांत दावे ९९१ फैसल झाले व एका मोर्शीच्या तहशिलदार कोर्टांत १२१७ दावे फैसल झाले. यावरून कामाचें स्वरूप पहावें. स्मालकाज कोर्टें लोकांस सोईचीं नाहींत नाहींत किंवा तेथील न्यायास लोक नाराज आहेत व मुनसफ कोर्टें अधिक सोईचीं व प्रिय. आहेत असा

अर्थ नाहीं, फक्त स्मालकाज कोर्टें चालण्या जोगा या प्रांतांत व्यापार नाहीं. आह्मी आशा करतों कीं आमचे कनवाळू रेसिडेंट साहेब या आमच्या ह्मणण्याचा पूर्ण विचार करतील व सरकारचा बचाव करून रयतेस अधिक सोय करून देतील.

जिल्ह्यांतील अपील कोर्टांत अवलकोर्टांचे ठराव गेल्या वर्षापेक्षां कमी बहाल राहिले. व अधिक फिरले आणि परतची कशीसही अधिक गेले. मे. जुडिशियल कमिशनर साहेब यांचे कोर्टांत अवलकोर्टांचे ठराव गेल्या वर्षापेक्षां ह्या वर्षांत अधिक कायम राहिले, व फिरले किंवा परत गेले यांची संख्या कमी आहे. रेसिडेंट साहेब ह्मणतात कीं जुडिशियल कमिशनर साहेबांचे कोर्टांतील कामाचें प्रमाण चांगलें आहे. आह्मीही कबूल करितों कीं अपिलें कमी होणें किंवा झालेले अपिलांत अवलचे ठराव कमी बदलणें हें अवलकोर्टांतील न्यायाधिशाचे शहाणपणाचें चिन्ह आहे व तशी स्थिति असावी अशी आमची इच्छाही आहे. परंतु अवलकोर्टांचे ठराव योग्य असून अपिलें विनाकारण अधिक होतील तर अवलचे ठराव फार कायम रहातील किंवा अपीलकोर्टांत दाव्याच्या हकीकतीची व कायद्याचे मुद्याची जशी छान व्हावी तशी न झाली तरीही अवलकोर्टांचे ठराव अधिक कायम रहातील, तेव्हां अवल ठराव पुष्कळ बहाल राहिले ह्यावरून दोन्हीही अनुमानें निघतात. ह्यांपैकीं अमुकच खरें असें ह्मणतां येत नाहीं. आतां याजवरून आमचे जुडिशियल कमिशनर मे० बेल साहेब अपिलाचें काम चांगलें पहात नाहींत असें आम्ही बिलकूल ह्मणत नाहीं. ते फार जुने व देशाचे पूर्ण अनुभवीक व माहितगार आहेत, मोठे मेहेनती आहेत हें आह्मास चांगलें ठाऊक आहे परंतु लोक कांहीं कारण नसतां अपील कोर्ट आहे ह्मणूनच केवळ अपिलें करतात असेंही आह्मास एकदम ह्मणतां येत नाहीं. कारण अवल कोर्टांत फैसल झालेले तक्रारी दाव्याची अपिलाचे नंबराशी तुळणा केली असतां शेकडा दोनही अपिलें झालीं नाहींत असें आह्मास दिसून येतें. सरासरी ७००० तक्रारी फैसल्यावर ८०० पेक्षां अधिक अपिलें कांहीं झालीं नाहींत यावरून आह्मास वाटतें की, अपिलाचें प्रमाण वऱ्हाडांत फार कमी आहे. व त्यांतूनही अवलचे ठराव बहाल होण्याचें प्रमाण अधिक आहे.

बजावणीचे कामांत सरकारी सान्याच्या जमीनी फार थोड्या विकल्या गेल्या आहेत. मुलकी खात्या मार्फत बंदोबस्त मागील वर्षापेक्षां या वर्षी अधिक झाले आहेत हें कांहीं वाईट नाहीं. जमीनीवरील रयतेचें स्वत्व कायम ठेवून कर्जाची आदाई करण्याची सोय सरकारानें पाहून काढावी हें विहितच आहे. ह्या संबधानें आतांचे कायद्यानें तर बहुतेक निकालच झाला आहे. आह्मास वाटतें कीं, रयतेची खरी वागणूक सरकारास न कळल्यामुळें व सावकार लोकांविषयीं सरकारचा एक प्रकारचा चमत्कारिक समज झाल्यामुळें नवे नवे अधिक सक्त कायदे होऊं लागले आहेत. परंतु परिणामीं हे रयतेच्या हिताचे न होतां उलटे नुकसानीस कारण होतील असें आह्मास वाटतें. असो तो विषय आज आह्मापुढें नाही. व त्याचा विचारही आज करणें नाहीं ह्मणून त्याची अधिक वाटाघाट नको परंतु रयतेस सरकार आपलें हित करित आहे हें कळत नसून सरकारच्या हेतूचा उपयोगही रयत करून घेत नाहीं. आणि सावकार लोकांस मात्र आपले पैसे वसूल करून घेण्यास दिवसें दिवस अधिक नडी येऊं लागल्या आहेत. हें एकंदरींत देशाच्या ऊर्जित दशेस व्यंग आहे असें आह्मास वाटतें.

याप्रमाणें न्यायखात्यांतील दिवाणी कामाची स्थिति आहे. आह्मास लिहिण्यास फार समाधान वाटतें कीं, जुडिशियल कमिशनर साहेब व आलिशान रेसिडेंट साहेब या उभयतांनींही अवलकोर्टाचे सर्व न्यायाधिशांचे एकंदर कामाची तारीफ केली आहे. त्यांत विशेषेकरून रा. रा. बापुजी रंगनाथ, रामराव गोविंद व गोविंदराज अप्पा यांणीं काम फार केलें असें कमिशनर साहेबांनीं ह्मटलें आहे. गोविंदराज अप्पा हे इंग्लिश जाणणारे, मोठे मेहेनती व हुशार आहेत. व रा. रा. बापुजी रंगनाथ व रामराव गोविंद हे केवळ मराठी न्यायाधीश असून यांचें व्यावहारिक ज्ञान न्यायांचे कामीं चांगळें मानवलें गेलें असून त्यांची वारंवार चहा होते याजबद्दल आह्मास संतोष वाटतो.

रेसिडेंट साहेबांनीं आपले अभिप्रायांत जुडिशियलें कमिशनर साहेबांचे रिपोर्टाबद्दल सर्व साधारण आपलें समाधान दर्शवून त्यांच्या सुव्यवस्थेबद्दल त्यांचे आभार मानिले आहेत. जुडिशियल क० सा० नीं या वर्षी सर्व कोर्टें पाहिलीं याबद्दल रेसिडेंट साहेबास विशेष समाधान वाटलें. ते ह्मणतात कीं, जुडिशियल कमिशनर साहेबांनीं स्वत! जाऊन पहाणी करणें आणि त्यानीं केलेले फैसल्याची वारंवार चांचणी पहाणें हें खालच्या कोर्टास त्यांच्या कामाचें चांगलें ज्ञान करून देण्याचा व खाते सुधारण्याचा मोठा उत्तम, फलद्रूप व खात्रीचा असा मार्ग आहे, सबब त्याला आह्मी विशेष महत्व देतों. आणखी ते असें ह्मणतात कीं डिपुटी कमिशनरानींही या गोष्टी कडे सदोदित लक्ष ठेवावें. आह्मांस रेसिडेंट साहेबांची ही सूचना व संमती फार उत्तम वाटते. सवांनीं असें केलें तर खात्यांत कांहीं उणीव राहणार नाहीं.

जुडिशियल कमिशनरचे क्लार्क व डिपुटी क्लार्क रा. रा. भास्कर सखाराम जयवंत व रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर हे आपापले कामांत निष्णात असून त्यांची जुडिशियल कमिशनर साहेबांनीं तारीफ केली आहे हें फार चांगलें झालें. ते तसेच आहेत. मि० जोन्स साहेब नवीन हेड क्लार्क यांचीही जुडिशियल कामिशनर साहेबानीं तारीफ केली आहे.

जुडिशियल कमिशनर साहेब यांणीं आपल्या रिपोर्टांत वकील लोकांविषयीं मत देतांनां कित्येक वकील हुशार वशहाणे आहेत व कित्येक आपल्या नावास शोभवीत नाहींत असें लिहून एकंदरींत ते सुधारत चालले आहेत असें ह्मटलें आहे. गेल्या वर्षी मात्री जुडिशियल कामिशनर साहेबांनीं कित्येक वकिलांचें नामनिदर्शन करून आपले विच्यार स्पष्ट दर्शविले होते व ह्या वर्षी मोहोगम आहे. आम्हास वाटतें कीं नावें दर्शविण्याचा प्रकार बरा; त्यामुळें ज्यांच्या विषयीं अधिकाऱ्यांचे ग्रह चांगले असतात ते आपली प्रतिष्ठा कायम राखण्यास सर्वकाळ जपतात. व इतर हुरूप बाळगून अधिक चलाखी दाखविण्यांत तत्पर रहतात

आतां फौजदारी शाखेकडील माहिती व तिजवर आमचे विच्यार कळविण्याची आज सवड नाहीं.

वऱ्हाड.

जुडिशियल कमिशनर साहेब सेशना करितां काल बुलढाण्यास गेले.

यवतमाळास डिपुटी कमिशनर साहेबा पुढें देशमुखाचा एक दिवाणी मुकदमा वतन प्रकरणीं चालला होता, त्यांत १६ दिवस सतत मुंबईकडील मि० स्टिपसी साहेब नावाचे बारिस्टर काम चालवावयास गेले होते व दुसऱ्या बाजूस एथून रा, रा. सदाशिव नारायण वकील व देवराव विनायक वकिल गेले होते. फैसला अजून सांगितला नव्हता.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं उमरावती हायस्कुलाचे हेडमास्तर रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांस २५० रुपये दरमहा पगार मिळण्याचा ठराव झाला.

हायर व लोअर स्यांडर्ड परीक्षेकरितां पहिली तारीख नमूद केलेली होती त्या दिवशीं फक्त एक उमेदवार जळगावचे नवीन तहशिलदार मि० किशोरखान हे लोअरकरितां आले होते व त्यांची हिंदुस्थानी भाषेंत परीक्षा झाली.

संकेताप्रमाणें मुलींची शाळा अकोल्यास काल शनिवारीं विजया दशमीचे मुहुर्तानें सुरू झाली. शाळेला जागा पुलाजवळ गुलाबरायाचे हवेलीचे खालील भागांत घेतली आहे. व मास्तर रा. रा. नारायण बापुजी पन्हाळकर यांस १० रुपये पगारावर नेमिलें आहे.

अकोला हायस्कुलांत मि० कादर हुसेन यास ३० रुपये होते ते ५० झाले व व एक जागा ६० रुपयांची ठरून आली आहे. ती ५० रुपये पगाराचे दोन असिस्टंटांपैकीं एकास मिळेल असें वाटतें.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं रा. रा. बाळकृष्ण शास्त्री वापट उमरावतीचे डिपुटी इन्स्पेक्टर आजारी होऊन मुंबईस गेले होते तिकडे त्यांचे प्रकृतीस चांगला फरक पडला. व ते चांगल्या हवे करितां लवकर पुण्यास जातील अशी त्यांच्या हातचीं त्यांच्या मित्रमंडळीस परवा पत्रें आलीं आहेत त्यांवरून समजतें.

मनीआर्डरची व्यवस्था मोडून तशा प्रकारच्या हुंड्या पोष्ठ आफिसांतून सरकार देण्याची सुरवात करणार आहे. व तेणें करून लोकांची पहिल्यापेक्षां जास्ती सोय होणार आहे असें ह्मणतात.

देऊळगावाहून श्री संस्थान बालाजीकडून आह्मांस असें लिहून आलें आहे कीं, सरकार हुकुमानें यात्रेची जी बंदी झाली ती बाजार न भरविण्याविषयीं आहे. पण देवदर्शनास येणारे लोकांची यात्रा बंद नाहीं. खुली आहे. अशाबद्दल डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा बुलढाणे यांचा हुकूम साहे सबब आतां आह्मी तसें प्रासिद्ध करीत आहों.

मि० निकोलेटस असिस्टंट कमिशनर यांस व मि० डनलप स्माल काज जडज यांस क्रिमि० प्रो० कायद्याचे २७ ए० कलमांतिल कांहीं अधिकार दिले.

मि० अबदुल हक साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस जूनचे ६ वे तारखेपासून ४ महिन्यांची रजा मिळालेली आहे.

आह्मांस लिहिण्यास फार दुःख वाटे कीं, रा. रा. आपाजी शामराव एथील वकील यांचे अल्पवयी द्वितीय कुटुंब दसऱ्याचे दिवशीं निवर्तलें.

डा० ला साहेब स्यानिटरी कमिशनर एथें येऊन काम पाहूं लागल्यास फार दिवस झाले नाहींत तोंच ते पुन्हा रजेवर गेले व त्यां जागेवर डा० ईव्स साहेब यांची पुन्हा नेमणूक होणार.

एथील डिस्पेन्सरीवरील डाक्टर अप्पा कानु यांस अलीकडे मौजे मलकापुर एथें कैदी लोकांच्या औषध- पाण्यासाठीं नेलें आहे पण त्यांच्या जाण्यानें एथें गावांत मोठी गैरसोय झाली आहे. हल्लीं गावांत आजार पुष्कळ असून डा० अप्पा कानु हे त्याचा चांगला बंदोबस्त करीत असतां त्यांना अशा प्रसंगीं बाहेरगावीं नेणें त्यांचे वरिष्ठांस योग्य नव्हतें असें आह्मांस वाटतें. डिस्पेन्सरीकडील डाक्टर यांची नेमणूक बऱ्याच अंशीं गावांतून म्युनिसिप्यालिटी कडून पोंचत असतां अशी गावाची गैरसोय करून त्यांस बाहेर नेल्यानें मोठा बोभाटा आहे व आह्मांस त्या बाबदींत २।३ पत्रें आलीं आहेत तर मेडिकल खात्याचे मुख्याधिकारी त्यांना लवकर परत पाठवितील व गावांतील आजाऱ्यांची सुव्यवस्था राखितील असें आह्मी इच्छितों. तुरुंगाकडे स्वतंत्र डाक्टर आहे असें असतां गावाची गैरसोय करून इकडील डाक्टर तिकडे कां न्यावा? व अपराधी आजाऱ्यांची शुश्रूषा करून निरपराधी गाववाल्या आजाऱ्यांची हयगय करावी अशा कृत्यास कोण बरें ह्मणेल !

वर्तमानसार.

सोलापुर पोलिसानें रेलवेसंबंधी खटल्याचे प्रकरणांत कित्येक लोकांवर नाहक आग पाखडली त्याजबद्दल तेथील पोलिस इन्स्पेक्टर व दोन चिफ कानस्टेबल यांजवर फौजदारी मुकद्दमा होण्याची तजवीज चालू आहे असें कळतें.

सोलापुर शहरांत पाणी आणण्याकरितां दोन लक्ष रुपये कर्ज काढण्याचा म्युनिसिप्यालिटी विच्यार करीत आहे.

अहमदनगर जिल्ह्यांतील नेवाशाचे मामलेदार राव, साहेब निळकंठराव भगवंत मुळे यांचें स्त्रीविद्याभ्यासाकडे फार दिवसांपासून चांगलें लक्ष आहे व अलीकडे त्यांचें कुटुंब व कन्या निवर्तली त्यांचे स्मरणार्थ त्यांनीं नगरच्या मुलींच्या शाळेंत स्कालर शिप दिली आहे व कांहीं बक्षीस ही वर्षीक परीक्षेसमयीं दिले, हा त्यांचा उद्योग परम स्तुत्य आहे, व याजबद्दल तेथील अधिकाऱ्यांनींही त्यांची फार वाखाणणी केली असें कळतें.

मनमाड दौंड रेलवे या महिन्यांत पुन्हा चालू होणार असें वर्तमान आहे. व गेल्या आठवड्यांतील मोठ्या पावसानें गोदावरी भागाकडील पांच सहा मैल रस्ता खराब होऊन गेला असेंही वर्तमान आलें आहे.

नगर जिल्ह्यां त कोपरगाव तालुक्यांत वीज पडून एक मनुष्य मरण पावला.

नेटिव्ह संस्थनिकांच्या फौजांवरून एकेक युरोपियन आफिसर ठेवावाअशी सरकारास इच्छा झाली असल्याची अलीकडे वाटाघाट सुरूं आहे. संस्थानिकांच्या इच्छेविरुध्ध त्यांवर हा जुलूम होणार नसेल तर फार चांगलें. आमच्या राजे लोकांच्या अडमुठ्या व फाटक्या तुटक्या फौजेविषयीं सरकारास काय वाटतें कोण जाणे, आह्मी साफ ह्मणतो कीं, भिण्याचें बिलकूल कारण नाहीं. मग त्यांच्या फौजा परराष्ट्रावर नेण्यास उपयोगी पडाव्या हा इरादा आहे कीं काय कोण जाणे. तसें असेल तर फौजा सुधारण्याचा प्रकार त्यांच्या मर्जीनें व्हावा हें चांगलें असें आह्मास वाटतें.

वर्तमान पत्राच्या कायद्यावर फेरफार करण्याकरितां जो नवा कायदा होत आहे त्याबद्दल पुणें सार्वजनिक सभेनें गव्हरन र जनरल यांस अर्ज केला आहे.

इंडस व्याली स्टेट रेल्वे मुलतान पासून कोटरी (सिंध] पर्यंत ह्मणजे ५०७ मैल रस्ता येत्या महिन्याच्या पहिल्या तारखेस सुरू होणार ह्मणून कळतें.

पूर्व आफ्रिकेंत अफू लावण्या करितां पोर्तुगीज लोकांनीं एक कंपनी स्थापन केल्याचें कळतें. या कंपनीचें भांडवल १७,८०,००० रुपये आहे. ने.

पार्लमेंट सभेंतील मेंबर मि० बेनोढ स्टानफोर्ड यांनीं हैड्राफोबिया (श्वानदंश रोग) याजवर उत्तम निबंध लिहिणारास १०००रुपये बक्षीस देण्याचें प्रसिद्ध केलें आहे. या निबंधांत त्या रोगाचें संपूर्ण स्वरूप,त्याचा परिहार,व त्यावर उपाय चांगले प्रकारें लिहिलेले असावे.

कलकत्यांत एका प्रकारचें तेल विकायास आलें आहे, त्याचा उपयोग केल्यावरून बहुत लोक आजारी झाले आहेत, त्यांच्या रोगांचीं लक्षणें पटकीच्या लक्षणासारखींच आहेत.

एका भाडेकऱ्यानें ट्रिग्नामेट्रिकल सर्वेक डील आफिसर मि० हाल यांस गाडी देण्याचें नाकारलें ह्मणून त्याला २० रुपये पुण्याचे मा. नीं. दंड केला. ज्ञा. द.

ता.३ सप्तंबर १८७८ रोजीं मध्यरात्रीं सचीन व नवसरीच्या दरम्यान आगगाडी चालली असतां चंद्रकोरी प्रमाणें तेजः पुंज पदार्थाचा उजेड पडला. ज्यांनीं तो पाहिला त्यांस एकाएकीं दिनप्रभा झाल्याचा भास झाला. तो सतेज पदार्थ हळूं हळू क्षितिजापासून सुमारें ५ फूट वर चढून सुमारें अर्धा तासानें एकाएकीं मावळला. सदर रात्र निबिड अंधारी व धुक्याची असल्यामुळें तो एकदम मावळतांच थोडेंसें पहाणारांस भयही वाटलें. पु. हे.

ने. ना. गव्हरनर सा. बहादूर यानीं पुण्याच्या इंजिनियरिंग व डेक्कन कालेजांतील सर्व विद्यार्थी व पूना हायस्कूल एथील कांहीं विद्यार्थी, तसेंच गांवांतील कामगार व बडेलोक या सर्वांस सोमवारीं रात्रीं ९ वाजतां गणेशखिंडींत त्यांचे बंगल्यांत ईव्हिनिंग पार्टीस बोलाविलें होतें.

मुनसफीचे परीक्षेबद्दल नवीन असा ठराव झाल्यासारखें आहे. कीं प्रत्येक उमेदवाराची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेली असावी. उमेदवारानें शेकडा ६५ गुण मिळविले पाहिजेत. हल्लींचे विषयांत मर्कन्टाइल लॉ नवीन सामील केला आहे.

गुजराथेंत दोन आठवड्यामागें अति पर्जन्य वृष्टि होऊन बहुतेक पिकांचें नुकसान झालें.

विक्रीस तयार दिवाणी कामाच्या वहिवाटीच्या जाहिराती.

नव्या दिवाणी कायद्याच्या अनुरोधानें वहिवाटीकरितां अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं वऱ्हाडास लागू करावयाच्या जाहिराती रेसिडेंट आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध केल्या व त्याचें मराठी भाषांतर मे. जुडिशियल कमिशनर साहेब यांनीं ताब्यांतील सर्व कोर्टाकरितां आपले आफिसांत तयार करवून छापिले त्याच्या प्रति आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. त्यांची किंमत सहा आणे व बाहेर गावीं मागणारास अर्धा आणा डाक हशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे
मालक

जाहिरात
कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें " सिद्धांतकौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टिपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा अनुवृत्तिपूर्वभाग, इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे, शिवाय दोनशे शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, साच्या मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा. पण वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस 'पोष्टपेड' पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८
रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साह कर्ते.

विक्रीस तयार
महामारीवर नवीन पुस्तक.

भिरजेचे दवाखान्यावरील मेडिकल आफिसर डा. त्रिंबक सखाराम सिरवलकर यांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें महामारी, तिचीं कारणें, निवारण व उपाय यांजवर पुस्तक छापलेलें आह्माकडे विक्रीस आलें आहे. त्याची किंमत सहा आणे व बाहेर गावीं डाक हशील अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

जाहिरात
उपयुक्त ज्ञानसार.

आह्मी गेल्या जानेवारीपासून " उपयुक्त ज्ञानसार " नावाचें मासिक पुस्तक काढून, त्यांत शेतकी. कारागिरी आणि इंजिनियरिंग ह्या तीन प्रकरणांची माहिती लिहित आहो. पहिल्या विषयांत भूमिपरीक्षा, खतांचे गुणधर्म व त्यांचा उपयोग, पिकाचें मान आणि वनस्पतीपासून व्यापारोपयोगी पदार्थ, स्वदेशांतील व परदेशांतील कारागिरी विद्या, व शिल्पसंबंधी आणि इंजिनेरचे कामाची वेंचक माहिती देत असतों, पुस्तकाची अगाऊ किंमत घेण्याचें सुरू केल्यापासून एक महिन्याचे आंत ५ रुपये व बाहेरचे लोकांस पोस्टेज सहा आणे पडेल. हें पुस्तक संग्रह करण्या लायक आहे.

नवीन पुस्तकें तयार आहेत तीं,— साहित्यमालिका १–२, सार्थपांडवगीता ८ आणे, सार्थ गणेशगीता ३ रुपये, सार्थ सप्तशती रेशमी ३।८, सार्थ सत्यविनायक पूजाकथासहित ०।१; या पुस्तकांबद्दल पत्रव्यवहार ठेवणें तो पुणें एथें ज्ञानचक्षूंत, ज्ञानप्रकाशांत, मुंबई एथें इंदुप्रकाशांत आणि वऱ्हाडांत अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत ठेवावा.

पुणें हसबनिसांचा वाडा घर नंबर ३३४
काशिनाथ महादेव थत्ते.

सन १८७९ सालची रोजनिशी.

या पुस्तकास दरसाल जसजसा आश्रय मिळत गेला त्या मानानें दरसाल ज्यास्त सुधारणा करून ते आह्मी पांच सहा वर्षें तयार करीत आलों. सदरील सालच्या रोजनिशीचा साचा पूर्वी इतकाच असून सुधारणा मात्र थोडी जास्त केली जाईल. येत्या नोवेंबरचे २५ वे तारखेस छापून तयार होईल. यांत इंग्रजी मुसलमानी मराठी महिने. तारखा, वार, तिथि वगैरे चीं माहिती दिली जाईल. शिवाय दर सालांत येणारे विशेष उपवास, ग्रहणें, सण व त्या संबंधी सरकारी आफिसांस असणाऱ्या सुट्या वगैरेचीही माहिती असेल. मैंजी, विवाहाचे मुहूर्त, रवी उदय अस्ताचें कोष्टक रोजमुरा चुकविण्याचे माहितीचें कोष्टक, वगैरे निराळींच दिलीं जातील. रेलवे, तारायंत्र, स्टांप, मनीआर्डर, पोष्ट [विम्याच्या दरांत झालेल्या फेरफाराच्या माहिती सुद्धां) सिविलप्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणारी कायद्याची माहिती वगैरेचा समावेशही केला जाईल. समय विशेषीं जास्त मजकूर लिहिण्याची पाळी आली किंवा जमाखर्चाच्या स्मरणार्थ टिपण करून ठेवावेंसें वाटलें तर याकरितां कांहीं जमाखर्चाच्या सदराचे व कांहीं कागद अखेरीस जोडले जातील. महिना, तारीख, वार, तीथ वगैरे संक्षपानें न देतां पूर्णपणें लिहिण्यांत येतील. व इंग्रजींतही महिना तारीख, वार, निराळा दिला जाईल तेणेंकरून ज्यांस मराठी समजत नाहीं अशा लोकांसही या रोजनिशीचा उपयोग होईल. पुढील ह्मणजे १८८० सालचे महिने, वार, तारखांचें कोष्टक इंग्रजी व मराठींत रंगी बेरंगी तयार करून निराळेंच जोडले जाईल. वगैरे हरएक प्रकारें होईल तितकी सुधारणा करण्यांत येईल. कागद उंची घालून बांधणीही एक दोन प्रकारानें करणार आहोत.

रोजनिशीची किंमत.

रोजनिशी प्रत नंबर १ ब्लयॉटिंग पेपर सहित जाड पुठ्यानें बांधलेली किंमत बारा आणे, ट० एक आणा.

रोजनिशी नंबर २ साधी जाड पुठ्यानें बांधलेली किंमत आठ आणे ट० एक आणा.

रोजनिशी प्रत नंबर ३ साधी विलायती कापडानें बांधलेली किंमत सात आणे टपाल हशील एक आणा.

वर लिहिल्या अन्वयें जी किंमत आक्टोबर आखेर आह्माकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्याबरोबर रवाना करण्यांत येईल. एकदम दहा प्रती घेणारास टपाल खर्च पडणार नाहीं.

भाउ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

हे पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १३ माहे अक्टोबर सन १८७८ इसवी. अंक ४१

वऱ्हाडसमाचाराची किंमत

	रुपये
वर्षाचे अगाऊ	६
सालअखेर	७
किरकोळ अंकास	०४
डाकहाशील.	
वर्षाचे अगाऊ	१०८
,, अखेर	२

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

नोटिसीबद्दल.

मराठी, १० ओळींचे आंत	१
१० ओळींपुढें दर ओळीस	०१०६
तीच नोटिस दुसरे खेपेस	०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस	०४
,, दुसरे खेपेस	०२

जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

	किंमत.
गजकरणाच्या डब्या	०६
महामारीवरील गोळी	०१
भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स	०६
वैद्यप्रकाश.	२०८
नादारीचे नियम.	०८

सदर्हू किंमती रोख व शिवाय डाकहशील पडेल.

सालाबादप्रमाणें देउळगावची यात्रा भरणार.

जाहिरखबर.

श्रीव्यंकटेश स्वामी संस्थान पेंठ देऊळगाव राजा तालुके चिखली जिल्हा बुलढाणें विद्यमान राणी अहिल्याबाई वालेद राजे मानसिंगराव जाधवराव जमीदार सरकार दौलताबाद यांजकडून.

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येत आहे कीं, संस्थान पेंठ देऊळगाव राज एथील यात्रेस दर्शनी लोकांनीं मात्र यावें, व्यापारी लोकांनीं येऊं नये अशी मनाई सरकारांतून झाली होती त्या बाबदींत संस्थानाकडून खु० डिपुटी कमिशनर साहेब बहादूर व रिविन्यु कमिशनर साहेब बहादूर यांजकडे बुलढाण्यास व अकोल्यास अर्ज झाले व संस्थानच्या मालक श्रीमती राणी अहिल्या बाई साहेब यांणीं अलीशान रेसिडेंट साहेब बहादूर यांजकडे तारेंतून अर्ज केल्यावरून एकंदर यात्रेची मोकळीक झाली. व खु० कमिशनर साहेब बहादूर यांणीं बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर साहेब यांस हुकुम दिल्यावरून त्यांनीं संस्थानास कळविलें कीं यात्रेस कोणत्याही प्रकारची मनाई नाहीं. व्यापारी, उदमी; बिछायती, दर्शनी हरप्रकारचे लोकांनीं बेलाशक देऊळगावचे यात्रेस जावें.

यावरून सर्वांस समजावें कीं व्यापारी लोकांस आतां कांहीं मनाई नाहीं. सबब त्यांनीं श्रीजीचे यात्रेस अवश्य यावें. मिति आश्विन शुद्ध ९ शुक्रवार शके १८०० मुक्काम बुलढाणें.

(सही) अमृत आत्माराम वहिवाटदार निा पांडुसा आणि कंपनी.

जाहिरात

कौमुदीमहोत्साहः

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें " सिद्धांतकौमुदी " संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग. अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा अनुवृत्तिपूर्वभाग, इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशे शद्बांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले,- सांच्या मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा. पण वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपाल खर्च नाहीं. या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मांस ‘ पोष्टपेड’ पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ — रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साहकर्ते.

जाहिरात

उपयुक्त ज्ञानसार.

आह्मी गेल्या जानेवारीपासून " उपयुक्त ज्ञानसार " नावाचें मासिक पुस्तक काढून, त्यांत शेतकी, कारागिरी आणि इंजिनियरिंग ह्या तीन प्रकरणांची माहिती लिहित आहों. पहिल्या विषयांत भूमिपरीक्षा, खतांचे गुणधर्म व त्यांचा उपयोग, पिकाचें मान आणि वनस्पतीपासून व्यपारोपयोगी पदार्थ, स्वदेशांतील व परदेशांतील कारागिरी, विद्या, व शिल्पसंबंधी आणि इंजनेरचे कामाची वेंचक माहिती देत असतों. पुस्तकाची आगाऊ किंमत घेण्याचें सुरू केल्यापासून एक महिन्याचें आंत ६ रुपये व बाहेरचे लोकांस पोस्टेज सहा आणे पडेल. हे पुस्तक संग्रह करण्या लायक आहे.

नवीन पुस्तकें तयार आहेत तीं,— साहित्यमालिका १—२ सार्थपांडवगीता ८ आणे, सार्थगणेशगीता ३ रुपये, सार्थसप्तशति रेशमी ३०८, सार्थ सत्यविनायक पूजा कथासहित ०११; या पुस्तकाबद्दल पत्रव्यवहार टेवणें तो पुणें एथें ज्ञानचक्षूत, ज्ञानप्रकाशांत, मुंबई एथें इंदुप्रकाशांत आणि वऱ्हाडांत अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत ठेवावा.

पुणें हसबनिसाचा वाडा घर नंबर ३३२ काशिनाथ महादेव थत्ते.

विक्रीस तयार

महामारीवर नवीन पुस्तक.

मिरजेंचे दवाखान्यावरील मेडिकल आफिसर डा. त्रिंबक सखाराम सिरवलकर यांनीं जाहिरात दिल्याप्रमाणें महामारी, तिचीं कारणें, निवारण व उपाय यांजवर पुस्तक छापलेंले आह्माकडे विक्रीस आलें आहे. त्याचीं किंमत सहा आणे व बाहेर गावीं डाक हशील अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

विक्रीस तयार दिवाणी कामाच्या वहिवाटीच्या जाहिराती.

नव्या दिवाणी कायद्याच्या अनुरोधानें वहिवाटाकरितां अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं वऱ्हाडास लागू करावयाच्या जाहिराती रेसिडेंट आर्डरमध्यें छापून प्रसिद्द केल्या व त्याचें मराठी भाषांतर मे. जुडिशियल कमिशनर साहेब यांनीं ताब्यांतील सर्व कोर्टांकरितां आपले आफिसांत तयार करवून छापिलें त्याच्या प्रती आमचे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आहेत. त्यांची किंमत सहा आणे व बाहेरे गावीं मागणारास अर्धा आणा डाक हशील पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

प्रश्नोत्तररत्नमालिका.

रा रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि०, महाराज, सदरील नावाच्या संस्कृत आर्या माझ्या पहाण्यांत आल्या. हीं प्रश्नोत्तरें फार उत्तम असून कविताही चांगली आहे ह्मणून मासल्यासाठीं आपणाकडे थोडी पाठविली आहे. आपणास आवडून प्रसिद्द झाल्यास पुढील भाग पाठविण्यांत येईल. लोभ करावा हे विनंती.

एक वाचक.

आर्या संस्कृत.

भगवन् किमुपादेयं,
गुरुवचनं हेयमपिच किमकार्यं ॥
को गुरु रधिगततत्वः,
सत्वहितायोद्यतः सततं ॥ १ ॥
त्वरितं किं कर्तव्यं,
विदुषा संसारसंततिच्छेदः
किं मोक्षतरोर्बीजं,
सम्यक् ज्ञानं क्रियासहितं ॥ २ ॥
किं पथ्यतरं धर्मः,
कः शुचिरिह यस्य मानसं शुद्धं ॥
कः पंडितो विवेकी,
किं विष मवधीरिता गुरवः ॥ ३ ॥
संसारे किं सारं,
बहुशोपि विचिंत्यमानमिदमेव ॥
मनुजेषु दृष्टतत्वं,
स्वपरहितायोद्यतं जन्म ॥ ४ ॥
मदिरेव मोहजनकः,
कः स्नेहः केच दस्यवो विषयाः ॥
का भववल्ली तृष्णा,
को वैरी यस्त्वनुद्योगः ॥ ५ ॥
कस्माद्भयमिह मरणा,
दंधादपि को विशिष्यते रागी ॥
कः शूरो यो ललना-
लोचनबाणै र्न विव्यथितः ॥ ६ ॥
पातुं कर्णांजलिभिः,
किम मृतमिव युज्यते सदुपदेशः ॥
किं गुरुतायामूलं,
यदेतदप्रार्थनं नाम ॥ ७ ॥
किं गहनं स्त्रीचरितं,
क श्चतुरो यो न खंडित स्तेन ॥
किं दारिद्र्य मतोषः,
किं लघुतामूलकं यांचा ॥ ८ ॥
किं जीवित मनवद्यं,
किं जाड्यं पाटवेप्यनभ्यासः ॥
को जागर्ति विवेकी,
का निद्रा मूढता जंतोः ॥ ९ ॥
नलिनीदलगत जलवत्,
तरलं किं यौवनं धन मथायुः ॥
के शशधरकरनिकरा-
नुकारिणः सज्जनाएव ॥ १० ॥

अर्थ

किं उपादेयं. ग्राह्य काय? गुरुवचन.

हेयं किं. त्याज्य काय ? अकार्य.

गुरु कोण ? जो तत्वज्ञ व सत्वहिताविषयीं सदा उद्युक्त तो.

त्वरित काय करावें ? संसारसंततिच्छेद.

मोक्षतरूचें बीज काय ? क्रियेसहित सम्यक ज्ञान.

पथ्य काय ? धर्म.

शुद्द कोण ? ज्याचें मन निर्मळ तो.

पंडित कोण ? विवेकी.

विष काय ? गुरूचा अपमान.

संसारांत सार काय? स्वपरहितोद्युक्त जन्म.